लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
# चतुरंग
आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी
chaturang@expressindia.com
शनिवार, ९ ऑक्टोबर २०२१




# पंचायतराज
## स्त्री नेतृत्वाचा 'यू टर्न'



**साधना तिप्पनाकजे**

■ ''मी सरपंचपदी निवडून आले आणि माझ्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली. प्रशिक्षणामुळे 'पंचायतराज' चांगल्या प्रकारे समजू लागलं. गावात कामं होऊ लागली. एका राजकीय पक्षाच्या 'महिला तालुका अध्यक्ष' या पदावर निवड झाली. मी केलेल्या कामांच्या विश्वासावर मी पंचायत समितीच्या निवडणुकीला उभं राहायचं ठरवलं. पण ऐन वेळी पक्षानं तिकीट नाकारलं. नंतर पक्षानं 'जिल्हा महिला आघाडी'त पदाधिकारी म्हणून नेमणूक केली. पण पुढल्या वेळीही मला तिकीट नाकारण्यात आलं.'' संगीता पडोळे आपला अनुभव सांगतात.

■ ''मी २००७ मध्ये ग्रामपंचायत सदस्य होते. २०१८ मध्ये सरपंचपदासाठी निवडणूक लढवली, पण आर्थिक पाठबळ कमी पडलं. गावात कितीही काम केलं, तरी त्याची किंमत नाही. हुशार बाई चालत नाही. राजकारण तिचा पाडाव करतं.'' - तारा कुंभाळकर यांचा अनुभव.

■ ''निवडून आल्यावर सरपंचांच्या गटाचे असाल, तर तुमचं काम होतं. विरोधी पक्षांमधील स्त्रियांची कामं थकवली जातात, असा अनुभव आहे. लोकांना सेवा देता येत नसेल, तर लोक पुन्हा कसं निवडून देणार, ही भीती माझ्या मनात होती.'' मधुमाला बावणऊके यांचाही असाच अनुभव.

■ ''विकासकामं करताना अडथळे आणले जातात. त्यामुळे मन स्थिर राहत नाही. घरचा ताण आणि बाहेरचा ताण हे सर्व असह्य होतं...'' - नंदा गायकवाड यांची खंत.

माजी स्त्री सरपंच आणि सदस्यांच्या गेल्या काही वर्षांतल्या प्रत्यक्ष अनुभवावरच्या या काही प्रतिक्रिया...

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना आरक्षण मिळून २९ वर्षं पूर्ण झाली आहेत. हा टप्पा पार केल्यावर अभिमानानं सांगता येतं, की स्त्रियांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रश्नांचे क्रम बदलले. गावातल्या कार्यालयाचं स्वरूप बदललं. तिथे होणाऱ्या दारूच्या पार्ट्या बंद झाल्या. स्त्रियांचं काम करण्यासाठी आणि करवून घेण्यासाठी कचेरीत येणं सुरू झालं आणि वाढलं. गावातील समस्यांचे प्राधान्यक्रम बदलले आणि त्यानुसार सुधारणा होऊ लागल्या. आरक्षण मिळालं, तेव्हा उमेदवारीकरिता स्त्रियांना शोधावं लागायचं. पण आता स्त्रिया मोठ्या संख्येनं पुढे येऊन राजकारणात सहभागी होत आहेत. या स्त्री नेत्यांच्या सोबतीला इतरही स्त्रिया सक्रिय मदतीसाठी घराबाहेर पडलेल्या दिसतात. पण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील याच स्त्री लोकप्रतिनीधींपैकी बहुतांश जणी आपल्या कामाचा पहिला किंवा दुसरा कालावधी पूर्ण झाल्यावर, गावकारभारात पाय ठाम रोवायचे सोडून 'यू टर्न' घेत पुन्हा एकदा फक्त 'घरकारभारा'च्या मार्गाला लागल्याचं दिसतं. प्रत्येक निवडणुकीत नवीन स्त्री नेतृत्व उदयाला येत असताना, त्याच्या कितीतरी अधिक पटीनं स्त्री नेतृत्व या सगळ्याकडे पाठ करत पुन्हा घरातच राहू लागलं आहे. रस्त्यावर वळण घेऊन पुन्हा आधीच्या ठिकाणी जायच्या चिन्हाला इंग्रजीत 'यू-टर्न' म्हणतात. याच वळणानं स्त्री नेतृत्व जात आहे. राज्यातल्या जिल्हापातळीवरील स्त्रियांच्या पंच-सरपंच संघटनांबरोबर आणि गावपातळीवर काम करताना याच्याशी संबंधित अनेक मुद्दे पुढे येत आहेत.

आज राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ५० टक्के स्त्री-आरक्षणामुळे १४ हजार सरपंच, १७५ पंचायत समिती सदस्य आणि १७ जिल्हा परिषद अध्यक्ष स्त्रिया आहेत. जिल्हा परिषद पातळीपर्यंत जोरदार कामगिरी करणाऱ्या या स्त्री लोकप्रतिनिधींकरिता पुढची कवाडं मात्र बंद आहेत. आरक्षणाच्या सुरुवातीच्या काळात दबकत वावरणाऱ्या स्त्रिया आणि आताच्या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि यशस्वी कामांमध्ये मोठा फरक पाहायला मिळतो. महिला बचतगटातून उदयाला आलेलं नेतृत्व, महिला सभेत मिळालेला हुरूप, यामुळे प्रेरित होऊन अनेक स्त्रिया निवडणूक लढवतात. तरुण आणि शिक्षित युवतीही गावविकासाकरिता पुढाकार घेताना दिसतात. पण या सगळ्यांना वरिष्ठ लोकप्रतिनिधींकडून फार क्वचितच चांगली वागणूक मिळते. 'लहान आहेस अजून' किंवा 'तुला त्यातलं काही कळणार नाही,' असं म्हणत नव्या ऊर्जेला निरुत्साही केलं जातं. अर्थात या दबावांपुढे न झुकता खंबीरपणे काम करायला सुरूवात केल्यावर विकासाचा वेग वाढतो, हे या स्त्रियांनी आत्तापर्यंत दाखवून दिलं आहे. स्त्री आणि पुरुषाच्या कामाच्या प्राधान्यक्रमाच्या बाबतीतल्या विचारसरणीतला फरक गावच्या प्रगतीतून दिसून आलेला आहे.

**आज राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ५० टक्के स्त्री-आरक्षणामुळे १४ हजार सरपंच, १७५ पंचायत समिती सदस्य आणि १७ जिल्हा परिषद अध्यक्ष या स्त्रिया आहेत. आरक्षणाच्या सुरुवातीच्या काळात दबकत वावरणाऱ्या स्त्रिया आणि आताच्या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि कामांमध्ये मोठा फरक पाहायला मिळतो. पण विरोधाभास हा, की जिल्हा परिषद पातळीपर्यंत जोरदार कामगिरी करणाऱ्या या स्त्री लोकप्रतिनिधींसाठी बहुतांशी पुढची कवाडं बंद होतात. याची कारणं अनेक आहेत, मात्र हिरिरीनं काम करणाऱ्या कित्येक 'गावकारभारणीं'ना माघार घेऊन 'यू टर्न' घेत पुन्हा फक्त 'घरकारभारीण' होण्यातच समाधान मानावं लागतंय, हे सध्याचं वास्तव आहे. महिला आरक्षणाला २९ वर्षं पूर्ण झाल्यावरही जर अशी परिस्थिती असेल तर त्याचा गांभीर्यानं विचार व्हायला हवा.**

> नव्वदच्या दशकात स्त्रियांच्या आणि लोकशाहीच्या दृष्टीनं दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण मिळालं आणि १९९४ मध्ये महाराष्ट्रात महिला धोरण जाहीर झालं. यामुळे स्त्रियांना राजकीय क्षेत्रात काम करण्याच्या संधी उपलब्ध झाल्या. सुरुवातीच्या गोंधळलेल्या अवस्थेपासून आणि ' 'ह्यां'ना विचारून सांगते'पासून पुढे जात आत्मविश्वासानं गावच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरणारे मुद्दे मांडत, प्रश्न सोडवण्यासाठी स्त्रियांना संघटित करत, अनेक लोकोपयोगी कामं करत स्त्री लोकप्रतिनिधीनी वेगानं मजल मारली आणि त्यातून प्रामुख्याने ग्रामीण राजकारणाचा चेहरा बदलला.

स्त्रियांची कामाच्या आखणीची पद्धत वेगळी आहे. त्यांच्यासाठी अतिमहत्त्वाच्या गोष्टीमध्ये गावचं आरोग्य, शिक्षण, पाणी ही जिव्हाळ्याची कामं येत असल्याने त्या कामांना वेग आला आहे. या चांगल्या कामांचा दबाव प्रस्थापितांवर येत आहे. हा दबाव मोडण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या स्त्रियांना पुढे जायची संधीच दिली जात नाही, असा त्यांचा अनुभव आहे. विरोधी गटातली स्त्री लोकप्रतिनिधी आपल्या मतदार संघाचं काम घेऊन गेली, तर ते काम अडकवून ठेवलं जातं, असाही अनेकींचा अनुभव आहे.

अनेक स्वयंसेवी संस्था, 'यशदा'सारख्या (यशवंतराव चव्हाण ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन) शासकीय प्रशिक्षण संस्था लोकप्रतिनिधींना पंचायतराज कारभाराचं प्रशिक्षण देतात. यामुळे त्यांना आपले अधिकार, कर्तव्यं कळू लागली आहेत. त्या आधारे स्त्री सदस्य गावच्या मासिक सभेत आपलं म्हणणं मांडू पाहातात, विषय उपस्थित करु पाहातात, परंतु या स्त्री सदस्यांचं म्हणणं अनेकदा ऐकून घेतलं जात नाही. सत्ताधारी गटातल्या स्त्रियांचाही आवाज अनेकदा दाबला जातो. पॅनेल प्रमुखही त्यांच्या मर्जीनुसारच स्त्री सदस्याला बोलायची मुभा देतो. विशेषतः आर्थिक विषयांवर स्त्री सदस्य बोलायला उभ्या राहिल्या, की सत्ताधारी आणि विरोधी सर्वच पुरुष एकत्र येत तिला गप्प बसवतात, असा सार्वत्रिक अनुभव आहे. काही ठिकाणी स्त्री सरपंच अथवा सदस्या स्वतः निर्णय घेत असतील, तर तिच्या नवऱ्याला व्यसनी बनवण्याचे प्रकारही दिसून आले आहेत, जेणे करून तिचं धैर्य संपुष्टात यावं. स्त्रीनं तिची निर्णयक्षमता वाढवली, तर अविश्वास प्रस्तावाचं हत्यारही उपसलं जातंच. 'गावचा पैसा गावासाठी' असा साधासरळ विचार या बहुतांशी लोकप्रतिनिधी स्त्रिया करतात. ते पैसे कमावण्याचं कुरण होऊ नये याची काळजी [illegible] त्यामुळे पुरुष सदस्यांना आर्थिक सत्ता हातातून जाण्याबरोबरच त्यांचं गावातलं स्थान डळमळीत होईल, ही भीती वाटते. यातूनच काही ठिकाणी स्त्री लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या कुटुंबीयांवरही हल्लेही केले गेल्याची उदाहरणं आहेत. ग्रामपंचायत सदस्यांच्या संरक्षणाकरिता कायदे केले आहेत, पण खटला दाखल करणं, आरोप सिद्ध करणं, यात स्त्रियांना अडचणी येतात, त्यात त्या मागे पडतात. या सगळ्यांमुळे होणारा मनस्ताप, घरांतील लोकांवर होणारा नकारात्मक परिणाम लक्षात घेता शेवटी 'हे काही नको... मी आणि माझं घर भलं' अशी भूमिका घेत स्त्रिया माघार घेतात असाच या गेल्या २७ वर्षांतला अनुभव आहे.

खरंतर ग्रामपंचायतीत घटनात्मकदृष्ट्या राजकीय पक्षांचं अस्तित्व नाही. पण इथल्या आघाड्या, गट, अप्रत्यक्षपणे राजकीय पक्षांचेच असतात हे सर्वांनाच माहिती आहे. आपल्या कामाचा कालावधी पूर्ण झालेल्या क्रियाशील स्त्रिया जेव्हा पुढच्या वेळी निवडणूक लढवायला उत्सुक असतात, तेव्हा त्यांना अनेकदा 'तिकीट' नाकारण्यात येतं. कारण या स्त्रिया गावपुढाऱ्यांना डोईजड ठरणाऱ्या असतात. 'तुम्ही एकदा निवडणूक लढवलीत ना, आता दुसऱ्यांना संधी द्या' असं त्यांना सुनावलं जातं. राजकीय नेते आणि गावपुढाऱ्यांचं गपगुमान ऐकणाऱ्या स्त्रियांना निवडणुकीसाठी पुढे केलं जातं. पुरुषांच्या बाबतीत मात्र दुसरी, तिसरी टर्म असं शेपूट वाढणारंच असतं. किंबहुना त्यांचा आलेख पंचायत समिती, जिल्हा परिषद, आमदारकी असा वाढता असतो. असा आलेख असणाऱ्या स्त्रिया मात्र हाताच्या बोटावर मोजण्याएवढ्याही नाहीत. पक्षाकडून नकार मिळाल्यावर काही स्त्रिया त्यांची कामं, लोकांचा पाठिंबा, या जोरावर स्वतंत्रपणे निवडणुका लढवतात. अशा वेळी अनेकदा आर्थिक पाठबळ कमी पडतं. राजकीय पक्ष किंवा प्रस्थापितांकडून पैशांचा खेळ खेळण्यात येतो. पैसे आणि घोडेबाजारात स्त्रिया मागे पडतात. काम करण्यात वाघ असणाऱ्या स्त्रिया कामाच्याच जोरावर निवडणुकीत उतरतात. त्यांच्यासोबत बचतगटातल्या कार्यकर्त्या, स्वयंसेवी संघटना, हे मनुष्यबळ असतं.पण यातल्या खूप कमी स्त्रिया जिंकतात.

यातला आणखी एक भाग म्हणजे, सर्वसाधारण मतदार संघात स्त्रियांच्या उमेदवारीला पुरुषांकडून विरोध केला जातो. 'तुमच्यासाठी ५० टक्के आरक्षित जागा आहेत ना? मग आमच्या जागेवर तुम्ही कशाला येता?' म्हणजेच सर्वसाधारण, खुल्या गटातली जागा, ही केवळ पुरुषांसाठीच आहे असा लोकांचा समज असतो. त्यामुळे बऱ्याचदा आरक्षणातून सरपंचपदी आलेली स्त्री पुढील निवडणुकीत आरक्षण नसल्यास (पान ३ वर)



# स्त्रीवादाची धगधगती मशाल

**गेली ५१ वर्षं अखंडपणे समाजातल्या सर्व प्रकारच्या असमानतेवर घणाघाती प्रहार करणाऱ्या कमला भसीन गेल्या. त्यांचा स्त्रीवाद म्हणजे पितृसत्ताक समाजव्यवस्थेविरुद्ध लढणारी धगधगती मशालच! देशभर आणि दक्षिण आशियाई देशांत फिरत त्या स्त्रियांचं जीवन भेदभावमुक्त, सक्षम व्हावं यासाठी अभ्यासपूर्ण मांडणी करत राहिल्या. बदल घडेल तो तरुण पिढीकडूनच, हे जाणून त्यांच्याशी संवाद साधत राहिल्या. पुरुषांचा तिरस्कार न करता पितृसत्ताक व्यवस्थेनं पुरुषांचंही किती नुकसान केलंय, हे सांगणाऱ्या ज्येष्ठ स्त्रीवादी विचारवंत, कार्यकर्त्या आणि लेखिका कमला भसीन यांचे विचार चिंतन करावेत, कृतीत आणावेत असेच...**

**आरती कदम**

''माझा स्त्रीवाद कधीही पुरुषांचा तिरस्कार करत नाही, की तो न मानणाऱ्या स्त्रियांचाही करत नाही. हो, मी 'फेमिनिस्ट' आहे आणि मी हसतेदेखील!'' 'फेमिनिस्ट बायकां'बद्दल अनेकांच्या मनात असणाऱ्या नकारार्थी प्रतिमेला कमला भसीन हसत हसत असा टोला लगावत आणि त्यांना ऐकणारे स्वीकृतीदर्शक हसून प्रतिसादही देत. कारण त्यांचं आत्तापर्यंतचं आयुष्य त्यांच्या याच वागण्याचं प्रतिबिंब होतं.

स्त्रीवादाच्या कट्टर पुरस्कर्त्या ७५ वर्षीय कमला भसीन हे रसरशीत, उत्फुल्ल, ऊर्जेनं काठोकाठ भरलेलं, अनेक दुःखं झेलूनही सदा हसरं व्यक्तिमत्त्व कर्करोगाचं निमित्त होऊन नुकतंच काळाच्या पडद्याआड गेलं असलं, तरी पितृसत्ताक समाज व्यवस्थेतील असमानतेविरुद्ध चालू ठेवलेलं काम, मग ते दक्षिण आशियाई स्त्री संघटना (संगत), 'जागोरी' संस्थेच्या माध्यमातून केलेलं काम असो, लिहिलेली अनेक पुस्तकं, कविता, विशेषतः लहान मुलांची गाणी, स्लोगन्स असोत, की वेगवेगळ्या ठिकाणी दिलेली भाषणं असोत, इतकं प्रचंड आहे की पुढच्या कित्येक पिढ्यांसाठी ते दिशादर्शक ठरू शकेल.

गेली ५१ वर्षं अखंडपणे समाजातल्या सर्व स्तरांतील असमानतेवर घणाघाती प्रहार करणाऱ्या कमला यांचा स्त्रीवाद म्हणजे पितृसत्ताक समाजव्यवस्थेविरुद्धची धगधगती मशाल होती. तिच्या प्रकाशात त्या सातत्यानं त्याविरुद्ध आवाज उठवत राहिल्या. देशभर, दक्षिण आशियाई देशांत फिरत राहिल्या. विशेषतः तरुण पिढीशी संवाद साधत राहिल्या. कारण त्यांना माहीत होतं, आता या पुढे बदलणार आहे ती फक्त तरुण पिढीच. जे सुशिक्षित आहेत, नियमित वाचणारे आहेत, विचार करणारे आहेत, त्यांच्यापर्यंत कमला भसीन गेली काही वर्षं मांडत असलेले (पान ३ वर)




epaper.loksatta.com